# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O)2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103,Fax -2690758E-mail divsec.kop@gmail.com


क्र.कोविम./माध्य.-२२/ 268
कोल्हापूर.४१६००४.
दिनांक -२८/०४/२०२२

.प्रति,

मुख्याध्यापक ,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय :- मार्च-एप्रिल २०२२ मध्ये आयोजित माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत..**

**संदर्भ :-**१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण २०१६/ प्र.क्र. २०२/ एस.डी. दि.२४/११/२०२२

२. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण १२१ /प्र.क्र.०९/ एस.डी.-२ दि.२६/०४/२०२२ चे पत्र

३. राज्यमंडळ पुणे यांचे जा.क्र.करामं/परीक्षा ७/२१४९ दि.२७/०४/२०२२ चे पत्र

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, शासन निर्णय दि.२४/११/२०१७ नुसार शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला सवलतीच्या गुणांचे दि.१५/०१/२०२२ पर्यंत विभागीय मंडळाकडे सादर करणेची मुदत होती. रेखाकला परीक्षेचा निकाल न लागल्याने कला संचालनालय, मुंबई यांनी सदर सवलतीचे गुण देण्याबाबत सादर करावयाच्या प्रस्तावास मे,२०२२ अखेर मुदतवाढ देण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

त्यास अनुसरुन शासनाच्या संदर्भीय क्र.०२ च्या पत्रान्वये शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी शाळेकडे सादर करण्यास दि.३१/०५/२०२२ पर्यंत व शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्यासाठी दि.०६/०६/२०२२ पर्यंत अंतिम मुदत वाढ केवळ या वर्षापुरती देण्यात येत आहे, असे निर्देश दिलेलेआहेत.

तरी मुख्याध्यापकांनी आपल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे प्रस्ताव नाव, बैठक क्रमांक व योग्य त्या कागदपत्रासह या कार्यालयाकडे ***दि.०६ जुन २०२२*** पर्यंत देण्यात यावेत व त्यानंतर प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

(सत्यवान डी.सोनवणे),
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## प्र क ट न

**विषय–** मार्च-एप्रिल २०२२ मध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक आदींना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय दिनांक २४/११/२०१७ नुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याचे प्रस्ताव विभागीय मंडळांकडे सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १५ जानेवारी २०२२ पर्यंत देण्यात आली होती.

शासनाच्या दिनांक २६/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे सवलतीच्या गुणांचे प्रस्ताव विदयार्थ्यांनी शाळेकडे सादर करण्यास दि.३१ मे २०२२ पर्यंत व शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी दि.०६ जून २०२२ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानुसार शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे परिपूर्ण प्रस्ताव माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे निर्धारीत मुदतीत सादर करावयाचे आहेत. यानंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

तरी मार्च-एप्रिल २०२२ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी (इ.१०वी) प्रविष्ठ सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक, सर्व माध्यमिक शाळा यांनी नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी. कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची सर्व शाळाप्रमुखांनी दक्षता घ्यावी.

(डॉ अशोक भोसले)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-०४

दिनांक २७/०४/२०२२